पुण्य नगरी

# 'ईसीई इंडिया एनर्जीज'ला 'सोलर क्वार्टर लीडरशिप मीट-कंझ्युमर्स चॉईस' पुरस्कार




**अमरावती :** स्थानिक 'ईसीई इंडिया एनर्जीज' कंपनीला 'सोलर क्वॉर्टर लीडरशिप मीट– कंझ्युमर्स चॉईस अवॉर्ड्स २०२१' अंतर्गत 'सोलर मॉड्यूल १००० व्होल्ट' या श्रेणीत विजेता म्हणून घोषित करण्यात आले. हैद्राबाद येथे झालेल्या पुर स्कार सोहळ्यात ईसीई इंडियाच्यावतीने कंपनीचे संचालक अनिकेत तोंडारे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ईसीई इंडियाने आजवर ५० मेगावॅटपेक्षा जास्त क्षमतेच्या सौर प्रकल्पांमध्ये अंमलबजावणी आणि समुपदेशक म्हणून यशस्वी कामगिरी बजावली आहे. ईसीई इंडियाची थापना अमित आरोकर यांनी २०१० साली केली होती. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्तेकंपनीला 'इंडिया ग्रीन एनर्जी' पुरस्कार प्राप्त झाला आहे. संचालकांनी यशाचे श्रेय कंपनीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिले.

Smart Amravati
Page No.3 December 03, 2021